स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदडेच्या मानव्यविद्या शाखे अंतर्गत इतिहास या विषयातील पीएच. डी. पदवीसाठी सादर करावयाचा शोध प्रबंधाचा आराखडा

-: संशोधन विषय :-

"युगपुरुष बाबा आमटे-जीवन व कार्य एक ऐतिहासिक अभ्यास"

-:: संशोधक ::-

अविनाश सुभाष घुसे

‹´Ö.‹.‡×ŸÖÆÖÃÖ, ›ß. ‹›.

मार्गदर्शक

डॉ. व्ही. व्ही. कदम

(‹´Ö.‹.‹´Ö. ×±ú»Ö, ¯Öß‹“Ö. ›ß)

विभाग प्रमुख

¯Ö¤¾Öß ¾Ö ¯Ö¤¾µÖ¢Ö¸ ‡×ŸÖÆÖÃÖ

हु. ज. पा. महाविद्यालय, हिमायतनगर नांदेड

2017

प्रस्तावना : -

महाराष्ट्र ही संत, महंत समाज सुधारक, विचारवंत यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली पवित्र भुमी आहे. अज्ञान अंधश्रध्दा, दारिद्रय, अन्यायकारक रुढी व परंपरांच्या जोखडातुन समाजाला मुक्त करणाऱ्या अनेक समाज सुधारकांचा तेजस्वी व ओजस्वी इतिहास महाराष्ट्राला »ÖÖ³Ö»Ö»ÖÖ †ÖÆ.

इतिहासाचा निर्माता हा कर्तृत्ववान स्त्री अथवा पुरूष असतो. अशा कर्तृत्ववान स्त्री पुरूषाची नोंद इतिहासकाराला घ्यावीच लागते. अशा कर्तृत्ववान स्त्री पुरूष हाच तत्कालीन राजकीय, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तनाच्या केंद्रस्थानी असतो. कर्तृत्ववान या शब्दाचा अर्थ फक्त पराक्रमी योध्दा किंवा लढवय्या शुर सेनापती एवढाच मर्यादित नसुन लोकशाही समाजात अन्यायाच्या विरूध्द कार्य करून समाज हित जोपासाणारी व्यक्ती असा व्यापक अर्थ होय.

विसाव्या शतकात भारताच्या अनेक प्रांतात, जिल्हयात महनिय व्यक्तींनी समाजाच्या विविध क्षेत्रात आपल्या कार्याचा मोलाचा ठसा उमटवलेला आपणास दिसुन येतो. भरकटलेल्या समाजाला योग्य दिशा देण्याचे काम समाज सुधारक करत असतो. महाराष्ट्राला अशा थोर समाज सुधारकांची उज्ज्वल व दैदिप्यमान परंपरा लाभलेली आहे. स्वातंत्र्यपुर्व काळात गो. ग. आगरकर, पंडिता रमाबाई, महर्षी धोंडो केशव कर्वे, विठ्ठल रामजी शिंदे, लोकहितवादी, विष्णुशास्त्री चिपळुणकर, ग.वा.जोशी, म. फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहु महाराज, सयाजीराव गायकवाड, या समाज सुधारकांनी समाज सुधारणा क्षेत्रात मोलाची कामगिरी पार पाडली. त्याचप्रमाणे स्वातंत्र्योत्तर काळात संत गाडगे बाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, मेधा पाटकर, अण्णा हजारे यांच्या नामवलीत मुरलीधर देविदास आमटे उर्फ बाबा आमटे यांचे नाव घ्यावे लागेल.

महाराष्ट्रातील वर्धा जिल्ह्यात हिंगणघाट येथे 26 डिसें. 1914 रोजी एका सधन कुटुंबात त्यांचा जन्म झाला. नागपुर विद्यापिठातुन एल.एल.बी.ची पदवी संपादन केल्यानंतर सन 1949 - 50 या कालावधीत त्यांनी कुष्ठरोग निदानावरील अभ्यासक्रम पुर्ण केला. स्वातंत्र्य चळवळीत काही काळ त्यांनी तुरुंगवासही भोगला. भारत जोडो अभियान, नर्मदा बचाव आंदोलन यातुन त्यांनी राष्ट्रीय एकात्मता व पर्यावरण संरक्षणाचा संदेश दिला. कुष्ठरोग्यांच्या सेवेसाठी सन

1952 साली आनंदवनाची स्थापना केली व स्वत:ला कुष्ठरोग्यांच्या सेवेसाठी वाहुन घेतले. सर्व ऐषोराम पायाशी लोळण घेत असतांना त्यांचा त्याग करुन जनसेवेसाठी ते सन्यस्त जीवन जगले. अशा थोर समाज सुधारकाचा मृत्यु 9 फेब्रुवारी 2008 रोजी रक्ताच्या कर्करोगाने झाला. जगाच्या इतिहासात अनेक महान समाजसुधारक होऊन गेल. बाबा आमटेंची तुलना या महान सुधारकात केल्यास अतिशयोक्ती होणार नाही. बाबा आमटेंच्या चरित्राचा व समाजकार्याचा सखोल अभ्यास सदर संशोधनाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.

संशोधनाची गरज व महत्त्व :-

बाबा आमटे हे विदर्भातील नामवंत समाज सुधारक होत. कुष्ठरोग्यांच्या पुनरुत्थानासाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले. भारत जोडो अभियाना अंतर्गत राष्ट्रीय एकात्मतेचा पुरस्कार केला तसेच नर्मदा बचाव आंदोलनाच्या माध्यमातुन पर्यावरणाविषयी मानवतावादी दृष्टीकोन जगापुढे ठेवला. कुष्ठरोग्यांच्या निराशामय व दुख:द जीवनाला विधायक वळण देण्याचे काम बाबा आमटे यांनी केले. अशा थोर समाज सुधारकांच्या जीवन व कार्याच्या अभ्यासाचे महत्त्व खालीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

1) समाज सुधारक या नात्याने सामान्य जनतेसाठी केलेले कार्य जाणुन घेता येईल.
2) बाबा आमटे यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याचा अभ्यास करता येईल.
3) बाबा आमटे यांचे कुष्ठरोग निवारण विषयक कार्य जाणून घेता येईल.
4) समाज सुधारक या नात्याने प्रत्यक्ष कार्य करत असताना आलेल्या अडचणी जाणून घेता µÖŸÖß»Ö.
5) बाबा आमटे लिखीत साहित्याच्या माध्यमातून त्यांची विचारसरणी व तत्त्वे यावर प्रकाश टाकता येईल.
6) युगपुरुष बाबा आमटे जीवन चरित्राचा सखोल अभ्यास करता येईल.
7) बाबा आमटेंनी स्थापन केलेल्या आनंदवन व इतर प्रकल्पाची वाटचाल अभ्यासता येईल.
8) बाबा आमटे यांच्या आदिवासी जमातीसाठी केलेल्या वैशिष्ट्यपुर्ण कार्याचा आढावा घेता µÖ‡»Ö.

विषयाची निवड व उद्दीष्ट्ये :-

महाराष्ट्रातील समाजसुधारकांचा स्वतंत्रपणे परामर्श घेण्याचा प्रयत्न फारच थोड्या संशोधकांनी केलेला आहे. काही संशाधकांनी या संदर्भात अनुषंगिक स्वरुपाचे लिखाण केले परंतु इतिहास संशोधकाने याकडे बरेचसे दुर्लक्ष केले आहे, हे मान्य करावेच लागेल. इतिहास संशोधनाच्या क्षेत्रातील ही उणिव दुर करावी व इतिहास ज्ञान क्षेत्रात नाविण्यपुर्ण योगदान देता यावे या भुमिकेतून 'युगपुरुष बाबा आमटे जीवन व कार्य एक ऐतिहासिक अभ्यास' या विषयाची निवड केलेली आहे. सदर संशोधनाची उद्दिट्ये खालीलप्रमाणे आहेत.

1) युगपुरुष बाबा आमटे यांच्या जीवन चरित्राचा सखोल अभ्यास करणे.
2) बाबा आमटे यांचे कुष्ठरोग निवारण विषयक कार्य स्पष्ट करणे.
3) समाज सुधारक या नात्याने कार्य करत असतांना आलेल्या अडचणींचा ऊहापोह करणे.
4) बाबा आमटे यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याचा अभ्यास करणे.
5) बाबा आमटे यांच्या साहित्यिक कार्याचा आढावा घेणे.
6) बाबा आमटे यांचा पर्यावरण विषयक दृष्टिकोन अभ्यासणे.
7) बाबा आमटे यांची सुधारणाविषयक विचारसरणी व तत्वांचा आढावा घेणे.
8) बाबा आमटे स्थापित आनंदवन प्रकल्पाची स्थापना वाटचाल व विकास अभ्यासणे.
9) बाबा आमटे यांनी आदिवासी जमातीसाठी केलेले वैशिष्ट्यपुर्ण कार्य अभ्यासणे.
10) समाजसुधारक या नात्याने बाबा आमटेंचे व्यक्तिमत्व जाणून घेणे.

गृहितके :-

1) कर्तृत्ववान स्त्री पुरुषांमुळेच इतिहास घडला जातो.
2) समाज सुधारक समाजाला योग्य दिशा देण्याचे कार्य करतात.
3) समाजाची नेमकी गरज काय व समाजाने नेमके काय केले पाहिजे हे समाज सुधारक š¸¾ÖŸÖ.
4) कर्तृत्वावान व्यक्ती समाजाच्या पाठिंब्यावर समाज कार्य करतो.

5) समाज सुधारकांचा वारसा हा त्यांच्या मुलांकडून चालवला जाऊ शकतो.

6) समाज सुधारकाच्या अंगी मानवतावादी दृष्टीकोन असतो.

7) समाज सुधारक हा प्रस्थापित सामाजिक संकेत धुडकावून नविन मुल्ये रुजवतो.

8) आनंदवन प्रकल्पाच्या विकासाचे श्रेय बाबा आमटे यांना आहे.

9) बाबा आमटे हे आंतरराष्ट्रीय किर्ती प्राप्त समाजसुधारक आहे.

10) समाजसुधारक बाबा आमटे यांची ओळख कुष्टरोग्यांचे संजीवक अशी आहे.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :-

'युगपुरुष बाबा आमटे जीवन व कार्य एक ऐतिहासिक अभ्यास' या संशोधनाच्या माध्यमातून बाबा आमटे यांचे सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक, पर्यावरण विषयक तसेच कुष्ठरोग निवारणाविषयक कार्यावर प्रकाश टाकण्यात येईल. तसेच प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती मर्यादित ठरवून घेतल्यामुळे संशोधनाला नेमकेपणा येणार आहे.

1) सदर संशोधनाची व्याप्ती ही बाबा आमटे यांचे जीवन व कार्य एवढीच मर्यादित राहील.

2) या संशोधनात सन 1914 ते 2008 पर्यतच्या कालखंडाचाच विचार करण्यात येईल.

3) संशोधनाचे निष्कर्ष बाबा आमटे यांच्या जीवनापुरतेच मर्यादित राहतील.

संशोधन पध्दती :-

'युगपुरुष बाबा आमटे जीवन व कार्य एक ऐतिहासिक अभ्यास' µÖÖ ×¾ÖÂÖµÖÖ¾Ö¸ß»Ö संशोधनाकरीता ऐतिहासिक संशोधन पध्दती मधील विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात येईल. तसेच आवश्यकतेनुसार सर्वेक्षण पध्दतीचा सुध्दा अवलंब करण्यात येईल.

संशोधन प्रबंधाचा संकल्पित आराखडा :-

1) प्रकरण पहिले - ²ÖÖ²ÖÖ †Ö´Ö™êü µÖÖ“Öê ¯Ö¾Ö Ö “Öx¸ü¡Ö

जन्म - बालपण - संस्कार - शिक्षण - विवाह - वैवाहिक - जीवन - तत्कालीन वृत्तांत या संदर्भात विवेचन व स्पष्टीकरण.

2) प्रकरण दुसरे - सामाजिक नेतृत्वाचा उदय.

3) प्रकरण तिसरे - बाबा आमटे यांचे कुष्ठरोग निवारण कार्यातील योगदान.

- **3.1** आनंदवन वरोरा 1952
- **3.2** अशोकवन नागपूर
- **3.3** सोमनाथ प्रकल्प - मूल
- **3.4** लोकबिरादरी प्रकल्प - हेमलकसा
- **3.5** लोकबिरादरी प्रकल्प - नागेपल्ली

4) प्रकरण चौथे - बाबा आमटेंचे साहित्य क्षेत्रातील योगदान

- **4.1** माती जागविल त्याला मत
- **4.2** ज्वाला आणि फुले (काव्य संग्रह)
- **4.3** सार्वजनिक संस्थांचे संचालन
- **4.4** ^••¾Ö»Ö ^ªÖÃÖÖšß
- **4.5** करुणेचा कलाम

5) प्रकरण पाचवे - बाबा आमटेंचे इतर क्षेत्रातील योगदान

- **5.1** वन्यजीव संरक्षण
- **5.2** नर्मदा बचावो आंदोलन
- **5.3** स्वातंत्र्य चळवळीतील कार्य
- **5.4** भारत जोडो अभियान
- **5.5** शैक्षणिक कार्य
- **5.6** व्यवसाय प्रशिक्षण

6) प्रकरण सहावे - बाबा आमटेंना प्राप्त पुरस्कार

†) आंतरराष्ट्रीय पुरस्कार

6.1 रॅमन मॅगसेसे पुरस्कार

6.2 डेमियन डट्टन पुरस्कार 1985

6.3 मानवी हक्क पुरस्कार 1998

6.4 टेम्पल्टन पुरस्कार 1990

6.5 रोल ऑफ ऑनर 1991

6.6 ग्लोबल 500 पुरस्कार 1991

6.7 ¸ö‡™ »ößß¾ö»ößÆ› †¾öö› 1991

²ö) भारतीय पुरस्कार

6.1 ¯ö¤´öÁöß 1971

6.2 पद्विभूषण 1986

6.3 महाराष्ट्र भूषण 2004

6.4 इंदिरा गांधी पुरस्कार 1985 (म. प्रदेश सरकार)

6.5 आदिवासी सेवक पुरस्कार 1991 इत्यादी

7) प्रकरण सातवे - निष्कर्ष

7.1 प्रकरणनिहाय सारांश

7.2 ठळक निष्कर्ष

7.3 सैद्धांतिक मांडणी

7.4 नवे सूत्र

7.5 ^¯öÃöÆö¸

-:: संदर्भ ग्रंथ सुची ::-

1) बाबा आमटे : माती जागविल त्याला मत, रसिक आन्तरभारती प्रकाशन

2) बाबा आमटे : ज्वाला आणि फुले ,रसिक आन्तरभारती प्रकाशन

3) बाबा आमटे : सार्वजनिक संस्थांचे संचालन ,रसिक आन्तरभारती प्रकाशन

4) बाबा आमटे : उज्ज्वल उद्यासाठी ,रसिक आन्तरभारती प्रकाशन

5) बाबा आमटे : करुणेचा कलाम

6) साधनाताई आमटे : समिधा

7) प्रकाश आमटे : आनंदवन प्रयोगवन

8) प्रकाश आमटे : प्रकाशवाटा, समकालिन प्रकाशन

9) विलास मनोहर : मला (न) कळलेले बाबा आमटे

10) मुळ लेखिका - तारा धर्माधिकारी : बाबा आमटे चरित्र
हिंदी अनुवाद - डॉ. हेमा जावडेकर

11) भ. ग. बापट : बाबा आमटे चरित्र

12) निशा मिरचंदानी : बाबा आमटे यांचे जीवन चरित्र
मराठी अनुवाद - लिना सोहोनी
मेहता पब्लीशिंग हाऊस पूर्ण फेब्रुवारी 2008

13) बाबा आमट्यांचा चरित्रात्मक परिचय
रॅमन मॅगसेसे अवार्ड फाऊंडेशन

14) बाबा आमट्यांचा संक्षिप्त जीवनपट - महाराष्ट्र टाईम्स

15) **Wisdom song : The life of Baba Amte**
Nisha Mirchandani
Roli Books Pvt. Ltd. Delhi.

16) डॉ. नीला पांढरे : आधुनिक संत बाबा आमटे, उन्मेश प्रकाशन

17) डॉ. लिला दिक्षित : कुष्ठरोग्यांचे संजीवक बाबा आमटे,

मधुराज पब्लीकेशन (इ - बुक)

18) डॉ. ज्ञानेश्वर तांदळे : 111 महामानव

सरस्वती बुक कंपनी

19) श्रीकांत गोवंडे :105 श्रेष्ठ मानव, अनमोल प्रकाशन

20) **WWW. Bhaskar. com**

WWW. Hindi Media.in

WWW. Indiadaily.org

मार्गदर्शक

डॉ. व्ही. व्ही. कदम

(‹´ö.‹.‹´ö. ×±ú»ö, ¯öß‹“ö. ›ß)

विभाग प्रमुख

¯ö¤¾öß ¾ö ¯ö¤¾µö¢ö¸ ‡×ŸöÆöÃö

हु. ज. पा. महाविद्यालय, हिमायतनगर नांदेड

संशोधक

‹. ‹Ãö. ‘öÃö

(‹´ö. ‹. ‡×ŸöÆöÃö , ›ß. ‹›)